गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक ७३ वा ● शनिवार २९ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| 77Volume 1| Issue 73 | Date : 29/07/2023 | blow :Saturday | Page 4 Price 4

## विरोधी आघाडीची तिसरी बैठक २५ व २६ ऑगस्टला मुंबईमध्ये

नवी दिल्ली : इंडियन नॅशनल डेमोक्रॅटिक इन्क्लुझिव्ह अलायन्स (इंडिया) या नव्याने स्थापन झालेल्या विरोधी पक्षांच्या विरोधी आघाडीची तिसरी बैठक २५ ते २६ ऑगस्ट दरम्यान मुंबईत होणार आहे. 'इंडिया' आघाडीमधील सर्वच पक्षांमध्ये समन्वय साधणे गरजेचे आहे. संसदेत मांडलेल्या केंद्र सरकारविरोधातील अविश्वास प्रस्तावाबद्दल देखील विरोधकामध्ये मतभेद असल्याची चर्चा राजधानीतील राजकीय वर्तुळात सुरु आहे. यामुळे पुढे होणाऱ्या विरोधकांच्या बैठकीवर सर्वांचेच लक्ष केंद्रित झाले आहे. मुंबईत होणाऱ्या तिसऱ्या बैठकीत जागावाटपावर चर्चा होणार आहे. यामध्ये ११ सदस्यीय समन्वय समितीही अंतिम केली जाणार आहे. त्यात काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमके, आम आदमी पक्ष, जेडीयू, आरजेडी, शिवसेना (ठाकरे), एनसीपी, झारखंड मुक्ती मोर्चा, समाजवादी पार्टी आणि सीपीआय(एम) यांचा प्रत्येकी एक सदस्य असेल. महायुतीत समाविष्ट असलेल्या अन्य छोट्या पक्षांना समितीत स्थान मिळणार नाही. नवीन आघाडी स्थापनेनंतर ही पहिलीच वेळ आहे की ज्या राज्यात त्यांचा एकही सदस्य सत्तेत नाही अशा राज्यात सर्व २६ विरोधी पक्षांची बैठक होणार आहे. खरे तर महाराष्ट्रात भाजप-शिवसेना (शिंदे गट)- राष्ट्रवादी (अजित गट) यांचे सरकार आहे. यापैकी कोणीही इंडियाचा भाग नाही.

# अविश्वास ठरावाआधी विधेयक मंजुरीला विरोधकांचा आक्षेप




नवी दिल्ली : लोकसभेतील गदारोळात शुक्रवारी काही मिनिटांमध्ये तीन विधेयके मंजूर करण्यात आली. गेल्या तीन दिवसांमध्ये लोकसभेत कोणत्याही चर्चेविना सहा विधेयके संमत झाली असून, सभागृहात अविश्वास ठराव दाखल झाला असताना विधेयकांच्या मंजुरीला विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.मणिपूरच्या मुद्द्यावर विरोधकांच्या 'इंडिया'ने बुधवारी नियम १९८ अंतर्गत अविश्वास ठराव मांडला असून, त्यावर चर्चा होण्याआधी धोरणात्मक निर्णय घेतला जाऊ शकत नाही. मात्र, पंतप्रधान दुर्लक्ष करून लोकसभेत एकामागून एक विधेयके मंजूर केली जात आहेत, असे लोकसभेतील काँग्रेसचे गटनेते अधीररंजन चौधरी यांनी सांगितले. । पान २ वर

### अविश्वासावरील चर्चेची तारीख सोमवारी ठरणार

विरोधकांनी २६ जुलै रोजी अविश्वास ठराव मांडला असून, दहा दिवसांमध्ये ४ ऑगस्टपर्यंत लोकसभेत चर्चा करणे बंधनकारक आहे. १ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यातील कार्यक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. त्यानंतर हा ठराव चर्चेला येण्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यामध्ये सोमवारी संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्व पक्षांच्या गटनेत्यांशी सल्लामसलत करून तारीख व वेळ निश्चित केली जाणार असल्याचे समजते. संसदेचे पावसाळी अधिवेशन ११ ऑगस्टपर्यंत चालेल.

राज्य सरकारची महत्त्वाची घोषणा

## होमगार्डना सलग सहा महिने सलग काम

### तीन वर्षांनी केली जाणारी नोंदणी बंद




मुंबई : होमगार्ड अर्थात राज्य गृहरक्षक दलासंबंधित राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक महत्त्वाची घोषणा केली आहे. होम गार्डना आता सलग सहा महिने काम दिलं जाणार आहे आणि त्यासाठी ३५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच दर तीन वर्षांनी केली जाणारी त्यांची नोंदणी आता बंद करण्यात येईल अशीही घोषणा देवेंद्र फडणवीसांनी केली आहे. सरकारच्या या निर्णयाचा फायदा राज्यातील हजारो होमगार्डना होणार आहे.

होमगार्ड ही स्वेच्छित सेवा आहे. इतर राज्यात १८० दिवस काम दिले जाते. पण आपल्या राज्यात दिले जात नाही. माझ्या सरकारच्या काळात आपण १८० दिवस लागू केले, पण आर्थिक अडचणीमुळे हे परत थांबवले गेले. होमगार्डची खूप मदत होते, त्यामुळे आता ३५० कोटी रुपयांची तरतूद करुन होमगार्ड्सना सलग सहा महिने काम दिले जाईल. होमगार्डच्या सेवेसाठी ९५ कोटींची मर्यादा घालण्यात आली होती ती आता बंद करण्यात आली आहे. होमगार्डसाठी दर तीन वर्षांनी केली जाणारी नोंदणी बंद करण्यात येत आहे. होमगार्डना कवायत भत्ता देखील मंजूर केला आहे अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यात भाजपचे सरकार असताना, २०१९ साली तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी होमगार्डचा भत्ता वाढवण्याचा आणि त्यांना किमान १८० दिवस काम देण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी त्यांनी सांगितलं होतं की, होमगार्डचे बळकटिकरण करणे आवश्यक आहे, त्यामुळे होमगार्ड कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. होमगार्डना प्रती दिन ३०० रुपये भत्ता देण्यात येत होता. आता त्यामध्ये वाढ करून ५७० रुपये करण्यात यावा, तसेच त्यांच्या वयाची मर्यादा ५८ वर्षे करण्यात यावी, त्यांना वर्षभरातून किमान १८० दिवस काम देण्याचा निर्णय घेण्यात येईल. होमगार्डसाठी तक्रार निवारण यंत्रणा तयार करणे, नवनियुक्त पोलीस उपायुक्तांना प्रशिक्षणानंतर होमगार्डमध्ये नियुक्ती देणे, १३ जुलै २०१० चा शासन निर्णय रद्द करणे, उजळणी प्रशिक्षणाचा कालावधी वाढविणे, यांना महात्मा फुले जीवनदायी आरोग्य । पान २ वर

## पदव्युत्तर वैद्यकीय जागांमध्ये ११७ टक्क्यांची वाढ

नवी दिल्ली : देशातील पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठीच्या जागांमध्ये ११७ टक्क्यांची वाढ झाली आहे, अशी माहिती शुक्रवारी केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडवीय यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरातून दिली. पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठी २०१४ पूर्वी ३१ हजार १८५ जागा उपलब्ध होत्या. परंतु, आता ही संख्या ६७ हजार ८०२ वर पोहोचली आहे. देशातील वैद्यकीय महाविद्यालयांच्या संख्येत ८२ टक्क्यांनी वाढ झाली असून, २०१४ पूर्वी असलेल्या ३८७ च्या तुलनेत आता ७०४ वैद्यकीय महाविद्यालये आहेत, अशी माहिती मांडवीय यांनी दिली. एमबीबीएसच्या जागांमध्ये देखील ११० टक्क्यांची वाढ झाल्याचे ते म्हणाले. ५१ हजार ३४८ वरून ही संख्या १ लाख ७ हजार ९४८ पर्यंत पोहोचली । पान २ वर

## महिला स्वयं सहायता गटांना दुपटीने अर्थसहाय ६० लाखांपेक्षा जास्त महिलांना लाभ : मुख्यमंत्री यांची घोषणा

मुंबई : उमेद अभियानातील महिलांच्या स्वयं सहाय्यता गटांना देण्यात येणाऱ्या फिरत्या निधीत दुपटीने वाढ करून ३० हजार रुपये निधी प्रत्येक गटांना देण्याचा तसेच कर्मचारी व चळवळीतील संसाधन व्यक्तींना देखील मानधनात भरीव वाढ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात निवेदन केले. महिलांची देशाच्या विकासात महत्वाची भूमिका आहे.

**फिरता निधी दुप्पट** आपल्या निवेदनात मुख्यमंत्री म्हणतात की, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयं सहाय्यता गटांना प्रती गट रु १५ हजार फिरता निधी देण्यात येतो. त्यामध्ये वाढ करुन प्रती समूह रु ३० हजार फिरता निधी देण्यात येईल. या वाढीमुळे अतिरिक्त रु ९१३ कोटी एवढ्या



निधीची तरतुद राज्य शासनामार्फत करण्यात येणार आहे.

**मानधनात दुपटीने वाढ** स्वयं सहाय्यता गटांना दैनंदिन मार्गदर्शन करण्यासाठी गावपातळीवर एकूण ४६ हजार ९५६ समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) कार्यरत आहेत. त्यांना सर्वसाधारणपणे दरमहा रु ३ हजार एवढे मानधन अदा करण्यात येते. बचत गट चळवळीतील त्यांचे योगदान व मागणी लक्षात घेऊन त्यांच्या मानधनात वाढ करून ते प्रति महा ६ हजार रुपये एवढे करण्यात येणार आहे. या करिता १६३ कोटी रुपये एवढ्या अतिरिक्त निधीची तरतुद करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. या अभियानात राज्यस्तरापासून ते क्लस्टर स्तरापर्यंत स्वतंत्र, समर्पित व संवेदनशील यंत्रणा तयार करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत अभियानांतर्गत एकूण २७४१ कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या मासिक मानधनामध्ये २० टक्के वाढ करण्यात येणार आहे तसेच त्यांच्या इतरही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले. स्वयं सहाय्यता गटातील महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंचे मूल्यवर्धन करणे ,गुणवत्तेत वाढ करणे , आधुनिक पॅकेजिंग व ब्रॅन्डींग करिता प्रोत्साहन देणे व उत्पादनांना । पान २ वर

## बॅरिस्टर आंबेडकर यांच्या वकिली प्रारंभ दिनाचा शताब्दी महोत्सव साजरा होणार बार्टीचा पुढाकार : सुनिल वारे

पुणे /प्रतिनिधी :लंडन येथील ग्रेज इन या नामांकित संस्थेत कायदेविषयक उच्च शिक्षण घेऊन सन १९२३ साली डॉ.भीमराव आंबेडकर बॅरिस्टर झाले. मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात वकिलीची सनद घेऊन दि.५ जूलै १९२३ रोजी बॅरिस्टर भीमराव आंबेडकर यांनी वकिलीचा प्रारंभ केला. हजारो वर्ष न्यायापासून वंचित उपेक्षित असलेल्या बहिष्कृत समाजाचे देशातील पहिले प्रतिनिधी म्हणून बॅरिस्टर आंबेडकर यांनी न्यायदालनात ठेवलेले पहिले पाऊल पुढील सामाजिक क्रांतीची नांदी ठरले. या ऐतिहासिक घटनेला यावर्षी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. याचा सर्व भारतीयांस सार्थ अभिमान आहे. मानवी स्वातंत्र्य लढ्यातील निर्भिड लढवय्या म्हणून ओळखल्या गेलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनातील या संस्मरणिय घटनेची आठवण कायम राहावी यासाठी बॅरिस्टर भिमराव आंबेडकर यांच्या वकीली व्यवसायाच्या प्रारंभदिनाचा शताब्दी महोत्सव साजरा करण्याची संकल्पना श्री.सुनिल वारे, महासंचालक- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी दि.०५जुलै



२०२३ रोजी बार्टी मुख्यालयात झालेल्या अभिवादन कार्यक्रमात मांडली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा तसेच अधिवक्ता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे लवकरच हा शताब्दी महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश मा. धनजंय चंद्रचुड, सर्वोच्च । पान २ वर

## राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार

### स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५ सप्टेंबर पूर्वी ऑनलाइन अर्ज करावेत

सोलापूर/प्रतिनिधी : राज्यात दिनांक १९ सप्टेंबर पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई यांच्या ार्हीर्ीें.श्रिवसारळश्र.ेा या मेलवर दिनांक ५ सप्टेंबर पूर्वी ऑनलाईन अर्ज करावेत. ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

या पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी कार्यपध्दत पुढीलप्रमाणे राहिल :-

या शासन स्पर्धेत, धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना सहभागी होता येईल. सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची पुरस्कारासाठी निवड पुढील निकषांच्या आधारे करण्यात येईल. यासाठी आवश्यक गुणांकनाची बाब व गुण पुढील प्रमाणे राहतील.

१.पर्यावरणपुरक मूर्ती(१० गुण), २. पर्यावरणपुरक सजावट (थर्माकोल/प्लॅस्टिक विरहीत)- १५ गुण. ३. ध्वनीप्रदुषण रहित वातावरण-५ गुण ४.पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन, इ. समाज प्रबोधन १ सामाजिक सलोखा संदर्भात सजावट / देखावा -२० गुण तसेच स्वातंत्र्याच्या चळवळीसंदर्भात / छत्रपती शिवाजी महाराजांच्या । पान २ वर

## मिशन इंद्रधनुष अंतर्गत जिल्ह्यातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

सोलापूर/प्रतिनिधी : विशेष मिशन इंद्रधनुष ५.० अंतर्गत जिल्ह्याच्या नागरी व ग्रामीण भागात पुढील तीन महिन्यात झिरो ते दोन वर्ष, दोन ते पाच वर्षे वयोगटातील एक ही बालक तसेच गर्भवती महिला लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी आरोग्य यंत्रणेने योग्य ती दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विशेष मिशन इंद्रधनुष ५.० अंतर्गत नियमित लसीकरणाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी डॉ. अमोल गायकवाड, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा साथरोग अधिकारी बिरदेव दुधभाते यांच्यासह सर्व संबंधित सदस्य उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्ह्यात ही मोहीम प्रभावीपणे राबवावी. ग्रामीण व शहरी भागातील सर्व बालक व गर्भवती महिला यांचे लसीकरण शंभर टक्के होईल त्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे.

आतापर्यंत एकही डोस न घेतलेले बालक तसेच अर्धवट डोस राहिलेले बालक यांचा शोध घेऊन त्या सर्वांचे लसीकरण करावे. ही मोहीम महानगरपालिका क्षेत्र व नगरपालिकेच्या क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे राबवण्यासाठी संबंधितांनी दक्षता घ्यावी असे त्यांनी सुचित केले.

मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत ग्रामीण भागातील बालके व गर्भवती महिलांना या मोहिमेच्या कालावधीत १००% लसीकरण करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने प्रयत्न करावेत असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी केले.

प्रारंभी जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. पिंपळे यांनी विशेष मिशन इंद्रधनुष ची माहिती बैठकीत दिली. यामध्ये लाभार्थ्यांची निवड ही झिरो ते दोन वर्षे वयोगटातील लसीकरणापासून वंचित किंवा गळती झालेल्या लाभार्थ्यांचे सर्व लसीद्वारे लसीकरण करणे, दोन ते पाच वर्षे वयोगटातील ज्या बालकांचे गोवर रुबेला लसीचा पहिला व दुसरा डोस राहिला असेल तसेच डीपीटी ओरल पोलिओ लसीकरण बुस्टर डोस राहिला असेल त्यांचे लसीकरण करणे आणि गर्भवती महिला यांचे लसीकरण करणे या पद्धतीने होणार आहे. तसेच ६ ऑगस्ट २०१८ किंवा त्यानंतर जन्मलेल्या बालकांचा या मोहिमेमध्ये समावेश असणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



ही मोहीम जिल्ह्यात पुढील तीन महिन्यात राबविण्यात येणार आहे. पहिला महिना ७ ते १२ ऑगस्ट २०२३, दुसरा महिना ११ ते १६ सप्टेंबर २०२३ व तिसरा महिना ९ ते १४ ऑक्टोबर २०२३ हा कालावधी असेल. ही मोहीम प्रत्येक महिन्यात सहा कामकाजाच्या दिवसांमध्ये राबवण्याचे नियोजित आहे. ही मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्यासाठी आरोग्य यंत्रणेची तयारी झालेली असून सर्व संबंधित विभागाच्या सहकार्याने सर्व बालकांचे लसीकरण करण्याचे नियोजन असल्याचे डॉ. पिंपळे यांनी सांगितले.

## ✻ सुविचार ✻

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

# संपादकीय

## कंत्राटी कामगार नकोसा...

६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मिळावे हा याचा मूळ उद्देश आहे. याकरिता देशभर लाखो कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. विविध श्रेणीतील हे कर्मचारी आहेत. यात उच्च विद्याविभूषितांची संख्या लक्षणीय आहे. अभियंता, तंत्रज्ञ, विषय साधन व्यक्ती, एमआयएस कॉर्डिनेटर, विशेष साधन व्यक्ती, विशेष शिक्षक (मोबाइल टीचर) यासह इतरांच्या पदव्या पाहिल्यानंतर यांचे शिक्षण अभियानात 'कामी' आल्याचे लक्षात येते. बीएड, एमएड आदी पदवी घेतलेले शाळातील शिक्षक प्रत्येक वेळी बदलणाऱ्या वेतन आयोगाप्रमाणे पगार घेत असताना हीच पदवी घेतलेले कंत्राटी कर्मचारी पाचव्या वेतन आयोगानुसार जेमतेम (अर्धा लाखही नाही) पगार घेताना दिसतात. वेतनातील तफावत अनाकलनीय आहे. हे कंत्राटी कर्मचारी दुर्गम भागातून पायपीट करीत किंवा दुचाकीचा प्रवास करून आपले कर्तव्य बजावताना पाहिल्यानंतर यांच्यावर पगार किंवा मानधनाबाबत होणारा अन्याय योग्य वाटत नाही. त्यांच्या कराराप्रमाणे शिक्षकांइतका पगार मिळणे शक्य नाही, असे घटकाभर मान्य केले तरी दरवर्षी मिळणाऱ्या मानधनात किमान दहा-पंधरा टक्के वाढ करण्यास काहीच हरकत नाही. समग्र शिक्षा या अभियानांतर्गत सेवेत असलेल्या महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असताना दुसऱ्या अभियानातून कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरवर्षी ठरावीक वाढ मिळत असते. त्यामुळे ते सुस्थितीत आहेत. समग्र शिक्षामध्ये केंद्राचा ६० टक्के, तर राज्याचा हिस्सा ४० टक्क्यांचा आहे. या योजनेतून शाळांच्या इमारती बांधणे, स्वच्छतागृह, विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजन, गणवेश आदी विविध कारणांसाठी निधी किंवा अनुदान दिले जात आहे. कोट्यवधींचा खर्च दरवर्षी केला जात असताना 'न्याय देता कुणी न्याय' असा आर्त टाहो फोडण्याची वेळ इमाने-इतबारे काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांवर यावी हा मोठा विरोधाभास आहे. तुटपुंज्या मानधनात घरखर्च कसा भागवायचा असा प्रश्न अनेक कंत्राटी कर्मचाऱ्यांसमोर आहे. पीएफ किंवा भविष्य निर्वाह निधीचीही तरतूद नसल्याने उच्च शिक्षण घेतलेल्या या कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये पदवी मिळविण्यासाठी केलेला आटापिटा व्यर्थ ठरल्याची भावना निर्माण होत असेल तर त्यांना दोष देता येणार नाही. या कर्मचाऱ्यांना शासकीय आरोग्य सुविधांचाही लाभ दिला जात नाही. त्यामुळे मोठे कुटुंब असलेल्या या कंत्राटी कर्मचाऱ्यांची अवस्था वाईट झाली आहे. बाहेर उच्च विद्याविभूषित म्हणून 'गुरुजीं'चा मिळणारा मान या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नकोसा झाला आहे.

**व्यक्ती विशेष**

## आंबेडकरी चळवळीतील भिवंडी तालुक्यातील निष्ठावंत कार्यकर्ता राजाभाऊ गायकवाड...

फुले, शाहु, आंबेडकरी चळवळ जिवंत ठेवण्याचे काम अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी, पुढाऱ्यांनी केले. असेच ग्रामीण भागातील ज्यांच नाव ओठावर येतं ते म्हणजे भिवंडी तालुक्यातीलल गोरसई येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ मारुती गायकवाड.

आपल्या विद्यार्थी दशेपासूनच ते आंबेडकरी चळवळीता भाग बनले. सामाजिक कार्याची जोपास लहानपणापासून त्यांना खुप आवड. ही आवड त्यांनी आज मा बा रु वयाच्या ६९ वर्षापर्यंत जोपासली आहे. राजाभाऊ मारुती गायकवाड यांचा जन्म भिवंडी तालुक्यातील समतानगर बोरिवली येथे एका गरीब कुटुंबात झाला. परिस्थिती हलाखीची असली तरी राजाभाऊ गायकवाड यांनी शिक्षण घेतले. भिवंडी तालुक्यातील पडघा येथे त्यांनी जिल्हा परिषद मराठी शाळेमध्ये सातवीपर्यंत शिक्षण घेतले तर दहावीपर्यंत पद्मश्री अण्णासाहेब जाधव धामणकर नाका या शाळेमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. तर बी.एन. एन. महाविद्यालय भिवंडी येथे त्यांनी आपली कला शाखेतून पदवी प्राप्त केली.

शिक्षण घेत असतानाच रामभाऊ गायकवाड यांनी आंबेडकरी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. राजाभाऊ गायकवाड यांना सामाजिक कार्याची लहानपणापासूनच आवड असल्याने त्यांनी ती आवड आजपर्यंत जोपासत वयाच्या ६९ वर्षापर्यंत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली होती.

महामानवांचे विचार घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी समाजाचे प्रबोधन व परिवर्तन होण्यासाठी भिवंडी शहरामध्ये त्यांनी सन १९७९ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला सुरु केली. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून अनेक विचारवंतांना त्यांनी बोलावून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार नागरिकांच्या मनामध्ये रुजवण्याचा प्रयत्न ते करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून त्यांनी भिवंडी शहरात अनेक उपक्रम राबविले व समाजाचे प्रबोधन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे वैशिष्टय म्हणजे व्याख्यानमालेच्या पहिल्या सत्रात जागतिक किर्तीचे आंबेडकरी चळवळीतील नेते पांडुरंग नथुजी राजभोज यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलविले होते.

पांडुरंग नथुजी राजभोज हे आंबेडकरी जनतेच्या न्याय, हक्कासाठी लढणारे एक समाजसुधारक होते. चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि पुण्यातील पर्वती सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. रायगड जिल्ह्यातील महाड येथे १९ व २० मार्च १९२७ रोजी झालेल्या चवदार सत्याग्रहातही डॉ. बाबासाहेब आंबेकरांच्या नेतृत्वाखाली राजभोग सहभागी झाले होते आणि अशा थोर समाजसुधारकाला प्रथमताच भिवंडी नगरीमध्ये व्याख्यानमालेच्या निमित्ताने समाजाच्या प्रबोधनासाठी आणण्याचे काम सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ गायकवाड यांनी केले. तर व्याख्यानमालेद्वारे महाराष्ट्रातील अनेक नामवंत कवी, लेखक, साहित्यिक, विचारवंतांना भिवंडी नगरीत मार्गदर्शनासाठी बोलविण्याचे काम सामाजिक कार्यकर्ते राजाराम गायकवाड यांनी केले. ठाणे जिल्ह्यात दलित पँथरची सुरुवात झाली त्या काळापासून राजाभाऊ गायकवाड हे दलित पँथरमध्ये ठाणे जिल्हा विभागीय संघटक म्हणून काम करु लागले. दि. ४ डिसेंबर १९८८ रोजी खडवली येथे धम्मपरिषद आयोजित करण्यात आली होती. त्या धम्मपरिषदेमध्ये संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी सवितामाई आंबेडकर यांच्या हस्ते सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ गायवाड यांना सन्मानित करण्यात आले होते. आपल्या सामाजिक कार्याची पोचपावती म्हणूनच राजाभाऊ गायकवाड यांना त्या कार्यक्रमांमध्ये सन्मानित करण्यात आले होते. अनेक माणसं जन्माला योतात आणि अतिशय उत्तम आणि सामाजिक काम करुन जातात त्याच्या मधलेच एक नाव म्हणजेचं राजाभाऊ मारुती गायकवाड.



डॉ. बाबासाहेब आंबेडरकरांचे नाव मराठवाडा विद्यापिठाला देण्यात यावे म्हणून संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता. त्या काळात राजाभाऊ गायकवाड यांनी विविध सभा, चर्चासत्रे, आंदोलने उभारुन नामांतराचा लढा लढवलेला होता. सन १९७९ साली मराठवाडा विद्यापीठ नामांतरासाठी नागपूर येथे गोळीबार झाला होता. त्यांच्या निषेधार्थ मोहन गायकवाड, शामुताई भोईर, यशवंत गायकवाड, सुरेश जाधव, वसंत कांबळे, एल.टी. गायकवाड, डी. जे सकपाळ, काळूराम जाधव, जि.टी. गायकवाड, मिलिंद तायडे आणि इतर कार्यकर्त्यांना घेऊन राजाभाऊ गायकवाड यांनी नामांतर कृती समिती स्थापन करुन लाँगमार्च काढण्यात आला होता. सत्याग्रहींवर जो क्रूर स्वरुपाचा अत्याचार करुन चार सत्याग्रही तरुण ठाणे केले आणि हजारो सत्याग्रहींवर लाठीमार करुन जबर जखम केले होते. त्याचा या कृती समितीने दहा दिवस साखळी उपोषण करुन निषेध नोंदविला होता. या कृती समितीचे अध्यक्ष राजाभाऊ गायकवाड होते. अन्याय, अत्याचार विरोधात लढण्याची ताकद ही राजाभाऊ गायकवाड यांच्या मध्ये होती. म्हणून कोठेही अशी अन्याय, अत्याचार करणारी घटना त्याच्यासमोर घडलेली दिसून आली तर त्या घटनेचा त्यांनी संविधानिकरित्या निषेध केलेला आहे. राजाभाऊ गायकवाड हे भिवंडी तालुक्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती अणि ती नेहमीच राहील. विविध संस्था संघटना, मंडळांच्या वतीने राजाभाऊ गायकवाड यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

भिवंडी तालुक्यातील श्रमिक मंडळाचे राजाभाऊ गायकवाड यांनी उपाध्यक्षपदी काम पाहिलेला आहे. तर एम.बी.एम संस्थेचे माजी सेक्रेटरी म्हणून राजाभाऊ गायकवाड यांनी काम पाहिले आहे. पद्मश्री आण्णासाहेब जाधव भारती समाज उन्नती मंडळ भिवंडी या शैक्षणिक संस्थेत सहभाग होता.या संस्थेच्या वतीने होता चालणारे समाजोन्नती साप्ताहिकाचे काम त्यांनी पाहिले. महाराष्ट्रात अनेक अनुसूचित जातीच्या नागरिकांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी तरुणांची संघटना दलित पँथर ची निर्मिती झाली. या संघटनेचा ठाणे जिल्ह्यामध्ये प्रसार व्हावा यासाठी या संघटनेचे ठाणे जिल्हा विभागीय संघटक म्हणून राजाभाऊ मारुती गायकवाड यांनी अनेक वर्षे काम केले.

आपल्या ग्रामीण भागात प्रत्येक सामाजिक कार्यक्रमात ते हजेरी लावत असत. अतिशय साधे सरळ राहणीमान, मनमिळाऊ शांत आणि संयमी स्वभावामुळे राजाभाऊ गायकवाड सर्वांनाच हवेहवेसे वाटत होते. त्यांच्या शांत स्वभावामुळे त्यांच्यामधला एक प्रामाणिक सामाजिक निष्ठावंत कार्यकर्ता दिसून येत होता. एवढंच नव्हे तर त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वामुळे एक निष्ठावंत आणि प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आज इतरांच्या नजरेतून पाहायला मिळते.

ग्रामिण आदिवासी भागातील जनतेने शिक्षण शिक्षणाच्या प्रवाहात यावे, अज्ञान दूर करुन आपले जीवन प्रकाशमान करावे. शिक्षणाच्या जोरावरती उद्याचं भविष्य घडवावं म्हणून भिवंडी तालुक्यात श्रमिक मंडळ ही संस्था तरुणांनी सुरु केली. या संस्थेची ग्रामीण आदिवासी भागातील जुनांदुर्खी व चाविंद्रा गावांमध्ये दोन माध्यमिक विद्यालये सुरु करुन या संस्थेचे सेक्रेटरी म्हणून राजाभाऊ गायकवाड यांनी अनेक वर्षे काम केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी व महात्मा ज्योतिबा फुले स्मृती शताब्दी १९९२ या निमित्त स्वतः समता या विशेषकाचे संपादन करुन महाराष्ट्राचे तत्कालीन समाजकल्याण मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते प्रकाशन केले होते. भिवंडीतील बालसंवर्धन केंद्र.अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था, कल्याण यामध्ये सक्रिय सहभाग राजाभाऊ गायकवाड यांचा होता.

सध्याच्या परिस्थितीमध्ये तरुण वर्ग शिकला पाहिजे त्यांनी शिक्षणाच्या जोरावरती आपले आर्थिक परिस्थीती सक्षमं केली पाहिजे या उद्देशाने १९९६ साली बाल संवर्धन केंद्र सुरु करण्यात आले. या केंद्राचे राजाभाऊ गायकवाड यांनी कार्याध्यक्ष म्हणून काम पाहिले. या बालसंवर्धन केंद्राच्या माध्यमातून युवकांसाठी कराटे प्रशिक्षण वर्ग, साहित्य सभा, चर्चासत्रे, कवी संमेलन, वकृत्व स्पर्धा तर अशा विविध स्पर्धा ठाणे जिल्ह्यामध्ये राजाभाऊ गायकवाड यांनी राबवल्या. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्ताने राजाभाऊ

गायकवाड यांच्या संकल्पनेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला ,लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्ट, माझी आई प्रतिष्ठान यांच्या वतीने प्रबोधन कवी संमेलनाचे आयोजन भिवंडीत करण्यात आले होते. राजाभाऊ गायकवाड यांच्या पुढाकाराने अनेक नवीन कवींना राजाभाऊ गायकवाड यांनी विचार मंच उपलब्ध करुन दिला. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार नवीन लेखकांच्या समोर व्यक्त केले.

राजाभाऊ गायकवाड हे अनेक तरुण सामाजिक कार्यकर्त्यांच्यया पाठीवर कौतुकाची थाप देऊन नवीन कार्यकर्त्यांना नवीन, नविन उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन करत होते.आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या उद्देशाने समाजाचे प्रबोधन आणि परिवर्तन व्हावं म्हणून अनेक सामाजिक कार्यकर्ते निःस्वार्थी भावनेने काम करत असतात. यातील एक नाव म्हणजे फुले शाहू, आंबेडकरी चळवळीत सक्रिय सहभाग घेणारे भिवंडी तालुक्यातील गोरसई येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते एक लढाऊ पँथर राजाभाऊ मारुती गायकवाड. त्यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदान नक्कीच नवीन पिढीला प्रेरणादायी ठरतील. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ गायकवाड यांच्या कार्यास सलाम. भावपूर्ण आदरांजली...

**लेखक – कवी, पत्रकार– मिलिंद सुरेश जाधव**
**रा.पडघा समतानगर, ता. भिवंडी**
**मो. ८६५५५६९४३६**

**पान १ वरुन**

## अविश्वास ठरावाआधी विधेयक..

सभागृहात ठरावावर तातडीने चर्चा करण्याची मागणी चौधरी यांनी केली. त्यावर, 'केंद्र सरकार मणिपूरच्या विषयावर चर्चा करायला तयार असून, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी तारीख व वेळ निश्चित केल्यानंतर अविश्वास ठरावावर चर्चा होईल', असे केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी संसदीय कामकाजासंदर्भातील पुस्तकाचा उल्लेख करून विधेयक मंजुरींना विरोध केला. मात्र, हा आक्षेप फेटाळत, नियम १९८ अंतर्गत देखील सभागृहाचे नियमित कामकाज, चर्चा करण्यास मनाई केली जात नाही, असे लोकसभाध्यक्षांनी स्पष्ट केले. संसद हे कायदेमंडळ असल्याने विधेयके मंजुरीला आक्षेप घेता येणार नसल्याचेही त्यांनी सांगितले. संसदेच्या दोन्ही सदनांत विरोधकांचा गोंधळ सुरू राहिल्याने दिवसाच्या पहिल्या सत्रात सभागृहे दिवसभरासाठी तहकूब करण्यात आली. दिल्ली सरकारच्या प्रशासकीय अधिकारांना कात्री लावणारे वादग्रस्त विधेयक सोमवारी लोकसभेत मांडले जाणार असल्याचे संकेत आहेत. हे विधेयक मांडण्यास राज्यसभेतील आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांनी विरोध केला. लोकसभेत अविश्वास ठरावावर चर्चा झाल्याशिवाय केंद्र सरकारने एकही विधेयक मांडू नये, असा आक्षेप चड्ढा यांनी घेतला. दिल्ली संदर्भातील विधेयकावर बिजू जनता दल, तेलुगु देसम या दोन्ही पक्षांनी अजूनही भूमिका स्पष्ट केलेली नाही. 'वायएसआर' काँग्रेसने विधेयकाला पाठिबा देण्याचा निर्णय घेतला असून बहुजन समाज पक्ष चर्चा व मतदानात सहभागी होणार नाही. भारत राष्ट्र समितीने विधेयकाविरोधात भूमिका घेतली आहे.

## महिला स्वयं सहायता गटांना दुपटीने..

हक्काची बाजारेपठ मिळवून देणे इत्यादी उपक्रम राबवून ग्रामीण महिलांचे सर्वार्थाने सक्षमीकरण करण्यासाठी शासन भविष्यात देखील कटीबध्द असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश देखील महिला स्वयं सहायता गटांमार्फत देण्यात येतील असे मुख्यमंत्री म्हणाले.

**बँक कर्जाची नियमित परतफेड**

मुख्यमंत्री आपल्या निवेदनात म्हणाले की, उमेद अभियानांतर्गत आतापर्यत सुमारे ६ लाख स्वयं सहाय्यता समूह स्थापित करण्यात आले असून यामध्ये ६० लाखांपेक्षा अधिक महिलांचा समावेश आहे. तसेच ३० हजार ८५४ ग्रामसंघ व १ हजार ७८८ प्रभागसंघ आहेत. या महिलांना उत्पन्न मिळावे म्हणून उमेद अभियान तसेच बॅकामार्फ़त अर्थसहाय्य देण्यात येते. स्वयं सहाय्यता गट स्थापन झाल्यानंतर ३ महिन्यानंतर त्यांना अंतर्गत कर्ज व्यवहाराला अर्थसहाय्य म्हणून रु.१० हजार ते रु १५ हजार याप्रमाणे फिरता निधी वितरीत करण्यात येतो. आतापर्यत ३ लाख ९१ हजार ४७६ गटांना रु. ५८४ कोटीचा फिरता निधी देण्यात आला आहे. तसेच आतापर्यंत ८० हजार ३४८ समूहांना रु.५७७ कोटीचा समुदाय गुंतवणूक निधी देण्यात आला आहे. आतापर्यत बॅकामार्फ़त राज्यातील ४.७५ लाख स्वयं सहाय्यता गटांना रु. १९ हजार ७७१ कोटीचे कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यामध्ये २०२२-२३ या एकाच वर्षात २ लाख ३८ हजार ३६८ स्वयं सहाय्यता गटांना तब्बल रु. ५ हजार ८६० कोटीचे बँक कर्ज देण्यात आले आहे. अभियानाअंतर्गत ९६% बँक कर्जाची परतफेड वेळेवर होत असून सध्यस्थितीत छझ- चे प्रमाण फ़क्त ४.३१% आहे त्यामुळे स्वयं सहाय्यता समूहांना कर्ज देण्यामध्ये बँका पुढे येत असून या गटातील महिलांना पतपुरवठा करण्यासाठी बॅका मोठ्या प्रमाणात सहकार्य करीत आहेत.

## होमगार्डना सलग सहा ..

योजना, अटल पेन्शन योजना व समूह अपघात विमा योजनेचा लाभ देणे आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले होते.

पण नंतर होमगार्डना १८० दिवस काम देण्याची योजना अंमलात येऊ शकली नव्हती. त्यावेळी आर्थिक अडचणींमुळे तो निर्णय अंमलात येऊ शकला नसल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी आता सभागृहात सांगितलं. त्यामुळे होमगार्डसंबंधित निधीची १७५ कोटींची मर्यादा आता काढून ती ३५० कोटीवर नेण्यात आली आहे. यामुळे राज्यातील होमगार्डना आता सलग सहा महिने काम करता येणार आहे.

## पदव्युत्तर वैद्यकीय जागांमध्ये ..

आहे. वैद्यकीय महाविद्यालयांच्या स्थापनेसाठी केंद्र प्रायोजित योजनेअंतर्गत (सीएसएस) गेल्या पाच वर्षांमध्ये १०१ वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी देण्यात आली असल्याचे मांडवीय म्हणाले. वैद्यकीय महाविद्या यांसह सरकारने एमबीबीएसच्या जागांमध्ये देखील वाढ केल्याचे मांडवीय म्हणाले. सीएसएस योजनेअंतर्गत तीन टप्प्यांमध्ये एकूण १५७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे.

## राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक..

३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्ताने सजावट / देखावा- २५ गुण. ५.गणेशोत्सव मंडळाने रक्तदान शिबीर, वर्षभर गडकिल्ले सवंर्धन, पर्यावरण रक्षण, सेंद्रीय शेती, सौर उर्जाबद्दल। जागरुकता निर्माण करणे, ॲम्बुलन्स चालविणे, वैद्यकीय केंद्र चालविणे इ. सामाजिक कार्य (अनु. क्र. ६ व ७ व्यतिरिक्त)- २० गुण ६ .शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक, आरोग्य, इत्यादीबाबत केलेले कार्य महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक/ आरोग्य / सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य- १५गुण ७. पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम/स्पर्धा- १० गुण ८.पारंपारिक/ देशी खेळांच्या स्पर्धा- १० गुण ९. महिला ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक आरोग्य सामाजिक इत्यादी बाबत केलेले कार्य- १५ गुण १०.गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा उदा. पाणी/ प्रसाधनगृह, वैद्यकीय प्रथमोपचार, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे आयोजन, आयोजनातील शिस्त, परिसरातील स्वच्छता (प्रत्येक सुविधेस ५ गुण) एकूण- २५. असे या स्पर्धेसाठी एकूण एक ते दहा बाबीसाठी एकूण १५० गुण ठेवण्यात आलेले आहेत.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गणेशोत्सव मंडळ यांना जिल्हास्तरीय पुरस्कार देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येणार असून राज्यस्तरीय पुरस्कारासाठी राज्यस्तरावर समिती गठीत करण्यात येणार आहे. वरील बाबींची पुर्तता करणाऱ्या / करु शकणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने करावयाच्या अर्जाचा नमुना पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक ४ जुलै रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ येथे आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने, पु. ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या इमेलवर दि. ५ सप्टेंबर पूर्वी ऑनलाइन अर्ज करावेत. प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी प्राप्त झालेले जिल्हा निहाय अर्ज संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास दि. ८ सप्टेंबर पूर्वी उपलब्ध करुन द्यावेत. याकरीता प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र इमेल आयडी तयार करुन सदर इमेल आयडी प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना त्यांच्या वरील इमेलवर दि. १५ ऑगस्ट पूर्वी कळवावे.

## बॅरिस्टर आंबेडकर यांच्या वकिली

न्यायालयाचे न्यायाधिश, मा. भूषण गवई तसेच मा. कायदा आणि न्याय मंत्री (भारत सरकार) हे इत्यादी मान्यवरांनी उपस्थित राहावे यासाठी संपर्क करणे सुरु आहे. मान्यवरांच्या तारखा मिळाल्या की आयोजन करण्यात येईल. सदर कार्यक्रमात देशभरातील कायदेपंडीत, कायदयाचे अभ्यासक, न्यायमूर्ती, अभिवक्ता मोठया संख्येने उपस्थित राहणार असल्याचे श्री.सुनिल वारे, महासंचालक बार्टी, पुणे यांनी कळविले आहे.

## मुलांना स्वावलंबन विषयी माहिती देणे गरजेचे : केंद्र प्रमुख सुरेश शटगार

दुधनी/प्रतिनिधी : दुधनीची शिक्षण परिषद जि.प.प्राथमिक कन्नड शाळा गांधी नगर दुधनी यांच्या वतीने परमशेट्टी हायस्कूल दुधनी येथे पार पडली प्रथम श्री सावित्रीबाई फुले प्रतिमेस जेष्ठ मुख्याध्यापक गौतम कांबळे यांच्या पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रथम सिध्दाराम हुणचलगी यानी सर्वाचे स्वागत केले. आदर्श परिपाठ घेण्यात आले. केंद्रातील सर्व मुख्याध्यापक यांचे गांधीनगर शाळेच्या वतीने पुष्प गुच्छ देऊन स्वागत सत्कार करण्यात आले.केंद्र प्रमुख बोलताना म्हणाले आजकालच्या जीवनात मुलांना संस्कारक्षम व स्वावलंबन याविषयी मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे आहे मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या दशसुत्री उपक्रम सातत्य प्रत्येक शाळेत राबविण्यात यावे अशा अनेक विषयावर मार्गदर्शन केले.



श्री कर यानी एफ एल मी याविषयी तर महादेव हुळ्ळी यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी कोणकोणते उपक्रम राबवावी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक स्वामीनाथ महामुनी यांनी नवीन बदलून आलेल्या सर्व शिक्षकांचे स्वागत केले.

यावेळी मुख्याध्यापक पोमू राठोड रेवणसिध्द आलिगावे श्री बाबा श्री उद्या श्री गौतम कांबळे श्री दोडमनी व केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते. सर्वांचे आभार महामुनी यानी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# हिंदू स्मशान भूमीचा मुद्दा पुन्हा चर्चेत ; वडार समाज बांधवांनी नगर परिषदेसमोर रचले सरण

दुधनी/प्रतिनिधीः येतील हिंदू स्मशान भूमीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. स्मशान भूमीत जाण्यासाठी रस्ता नसल्याने येथील १५ ते १६ समाज बांधवांची कोंडी झाली आहे. मात्र रस्त्यासाठी वेळोवेळी लेखी निवेदन देऊनही रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नसल्यामुळे या १६ समाजातील नागरिक आक्रमक झाले आहेत. सद्य स्थितीत ज्या रस्त्यावरून अंत्यसंस्कारासाठी जाणारा रस्ता आहे तो मालकी असल्याने त्या रस्त्यावर त्या जमिनीच्या मालकांनी काटे टाकून रस्ता बंद केली आहे. यामुळे दुधनीतिल हिंदू स्मशान भूमीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. दुधानीचे माजी नगराध्यक्ष भीमाशंकर इंगळे यांच्या निधना दिवशीही असाच प्रसंग उद्धवला होता. त्यावेळी स्थानिक भाजपचे नेते आणि मुख्याधिकारी आतिष वाळूंज यांनी सदर जमिनीच्या मालकांकडे विनंती केल्या नंतर सांभधीत जमीन मालकांनी स्मशान भूमीत जान्यासाठी रस्ता मोकळा करून दिला होता त्यानंतर माजी नगराध्यक्ष इंगळे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडला होता.

गुरुवारी रात्री वडार समाजातील श्रीमती रेणुका यल्लप्पा गोटे (वय – ३८) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भाजीपाला मार्केट जवळील हिंदू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्याचे ठरविण्यात आले. मात्र मागील तीन–चार दिवसांपासून सलग पडत असलेल्या पावसामुळे स्मशान भूमीत जाणाऱ्या रस्त्यावर चिखलांचे साम्राज्य पसरले असून रस्ता निसरडा बनला आहे. यामुळे त्या निसरडत्या रस्त्यांमधून जायचं कसं हा प्रश्न उद्धवल्याने वडार समाजातील काही नागरिक आणि तरुणांनी नगरपरिषदे समोर सरण रचून रेणुका यल्लप्पा गोटे यांच्या पार्थिवावर दहनविधी करण्याचे ठरवून दहन विधीसाठी लागणारे साहित्य नगरपरिषदे समोर आणून ठेवला. त्यानंतर नगर परिषद कर्मचारी खडबडून जागे झाले. आणि याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिस देखील नगरपरिषदेत पोहोचले. त्यानंतर इतर समाजातील नागरिक देखील नगर परिषदेत येऊन स्थानिक प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर नाराजी व्यक्त केली. येत्या आठ दिवसांत स्मशानभूमीत जाण्यासाठी कच्चा रस्ता तयार करून देण्यात येईल असे आश्वासन नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक चिदानंद कोळी यांनी दिल्यानंतर वडार समाजातील नागरिकांनी नगर परिषदे समोर दहनविधीसाठी रचलेला सरण हटवला.



**स्मशान भूमीत जाण्यासाठी जो मंजूर रस्ता आहे तो रस्ता एका नाल्याच्या बाजूला आहे. त्या नाल्यामधून पावसाळ्यात सतत पानी वाहत असतो. यामुळे त्या नाल्यावर पूल बांधणे आणि रस्ता तयार करणे गरजेचे आहे. मात्र स्थानिक प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने दरवर्षी पावसाळ्यात हा प्रश्न समोर येत आहे. अन्यथा स्मशान भूमिलागत असलेल्या ज्यांची जमीन आहे त्या जमीनदारानां विचारात घेऊन त्या जमिनीच्या मालकांना मोबदला देऊन रस्त्यासाठी जितका जमीन लागणार आहे तेवढ जमीन संपादित करणे गरजेचे आहे. मात्र स्थानिक प्रशासन २५ ते ३० वर्षांपासून कुठल्याही ठोस भूमिका न घेतल्याने रस्त्याचा प्रश्न पुन्हा एकदा चिघळला आहे.**

# मिशन इंद्रधनुष अंतर्गत जिल्ह्यातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

सोलापूर/प्रतिनिधीः विशेष मिशन इंद्रधनुष ५.० अंतर्गत जिल्ह्याच्या नागरी व ग्रामीण भागात पुढील तीन महिन्यात झिरो ते दोन वर्ष, दोन ते पाच वर्षे वयोगटातील एक ही बालक तसेच गर्भवती महिला लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी आरोग्य यंत्रणेने योग्य ती दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विशेष मिशन इंद्रधनुष ५.० अंतर्गत नियमित लसीकरणाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी डॉ. अमोल गायकवाड, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा साथरोग अधिकारी बिरदेव दुधभाते यांच्यासह सर्व संबंधित सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्ह्यात ही मोहीम प्रभावीपणे राबवावी. ग्रामीण व शहरी भागातील सर्व बालक व गर्भवती महिला यांचे लसीकरण शंभर टक्के होईल त्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. आतापर्यंत एकही डोस न घेतलेले बालक तसेच अर्धवट डोस राहिलेले बालक यांचा शोध घेऊन त्या सर्वांचे लसीकरण करावे. ही मोहीम महानगरपालिका क्षेत्र व नगरपालिकेच्या क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे राबवण्यासाठी संबंधितांनी दक्षता घ्यावी असे त्यांनी सुचित केले. मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत ग्रामीण भागातील बालके व गर्भवती महिलांना या मोहिमेच्या कालावधीत १००% लसीकरण करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने प्रयत्न करावेत असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी केले.



प्रारंभी जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. पिंपळे यांनी विशेष मिशन इंद्रधनुष ची माहिती बैठकीत दिली. यामध्ये लाभार्थ्याची निवड ही झिरो ते दोन वर्षे वयोगटातील लसीकरणापासून वंचित किंवा गळती झालेल्या लाभार्थ्यांचे सर्व लसीद्वारे लसीकरण करणे, दोन ते पाच वर्षे वयोगटातील ज्या बालकांचे गोवर रूबेला लसीचा पहिला व दुसरा डोस राहिला असेल तसेच डीपीटी ओरल पोलिओ लसीकरण बुस्टर डोस राहिला असेल त्यांचे लसीकरण करणे आणि गर्भवती महिला यांचे लसीकरण करणे या पद्धतीने होणार आहे. तसेच ६ ऑगस्ट २०१८ किंवा त्यानंतर जन्मलेल्या बालकांचा या मोहिमेमध्ये समावेश असणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

ही मोहीम जिल्ह्यात पुढील तीन महिन्यात राबविण्यात येणार आहे. पहिला महिना ७ ते १२ ऑगस्ट २०२३, दुसरा महिना ११ ते १६ सप्टेंबर २०२३ व तिसरा महिना ९ ते १४ ऑक्टोबर २०२३ हा कालावधी असेल. ही मोहीम प्रत्येक महिन्यात सहा कामकाजाच्या दिवसांमध्ये राबवण्याचे नियोजित आहे. ही मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्यासाठी आरोग्य यंत्रणेची तयारी झालेली असून सर्व संबंधित विभागाच्या सहकार्याने सर्व बालकांचे लसीकरण करण्याचे नियोजन असल्याचे डॉ. पिंपळे यांनी सांगितले.

# सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून कमांड अँड कन्ट्रोल सेंटर उभारणी

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून ICCC (कमांड अँड कन्ट्रोल सेंटर) उभारणी करण्यात आली असून त्याची पाहणी आज महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली–उगले यांनी केली. यावेळी नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी,सहाय्यक अभियंता महादेव इंगळे, अवेक्षक कल्याणी बिराजदार, आर्किटेक्चर शशिकांत चिंचोळकर आदी मान्यवर उपस्थित होते.शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करणेकामी केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी अशा इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या अमंलबजावणी करणेकरीता नियंत्रण कक्षाची आवश्यकता असलेने सोलापूर महानगरपालिकेच्या पाठीमागे नगर अभियंता कार्यालयाकडील भांडार गृहाच्या ठिकाणी नियंत्रण कक्षाची स्थापन करण्यात आली असून या इमारतीमध्ये शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत बसविणेत येणारे सीसीटीव्ही, एलईडी दिवे, कचरा संकलन केंद्राच्या गाड्या, पाणीपुरवठा वितरण प्रणाली यावर एकाच ठिकाणाहुन देखरेख होणार आहे. तसेच या ठिकाणी नागरिकांकरीता सोलापूर मनपाकडील, पोलिसांकडील आवश्यकत्या सुविधाचे एकत्रीकरण करणेत येणार आहे.

या नियंत्रण कक्षामध्ये स्काडा प्रणालीचे नियंत्रण ही ठेवणेत येणार आहे. तसेच शहरातील सुरक्षा व्यवस्था अबाधित राखणेकामी शहरातील १३० ठिकाणी सीसीटीव्ही बसवणे, २० ठिकाणी अटोमॅटिक ट्रैफिक सिग्नल, ई–चलन सिस्टीमद्वारे, आससीसी याद्वारे एकत्रित केले जाणार आहे. तसेच मनपाकडील कांही सेवा याद्वारे देणेत येऊन त्यांचे नियंत्रण केले जाणार आहे.सदरचे काम प्रगतीपथावर असून येत्या १५ ऑगस्ट पर्यंत सुरू करण्याचा प्रयत्न आहे अशी माहिती महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली– उगले यांनी दिली.

# दर्गा ट्रस्ट कमिटीच्या जागेवरील अनधिकृत नावे कमी करा अन्यथा उपोषण

## निफाड मुस्लिम बांधवांचे प्रांताधिकारी यांना निवेदन



निफाड/प्रतिनिधीः निफाड शहरातील कब्रस्थान दर्गा ट्रस्ट कमिटी चे अनधिकृत कब्जेदार यांचा ताबा काढून सदर जागा ही दर्गा ट्रस्ट ( वक्फ मंडळ ) कडे १४ ऑगस्ट पूर्वी वर्ग करावी अन्यथा १५ ऑगस्ट पासुन आपल्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा निफाड शहरातील मुस्लिम बांधवांनी प्रांताधिकारी हेमांगी पाटील यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे निवेदनात म्हटले आहे की ..येथील जामा मस्जिद वक्फ मिळकत असलेले . सर्वे क्र.३३७चे नवीन गट न.८१९/१..८१९/२...८१९/३....८१९/४...८२०च्या शेख फरीद पिर दर्गा व कब्रस्तान निफाड शिवारातील सर्वे न५३३ यासी जूना गट न .११४२यासी नवीन गट न २२५ क्षेत्र ३हेक्टर २४आर .पो ख १हेक्टर ७३आर . आकार३रुपये ८१पैसे या मिळकतीवरील ७/१२च्या उताऱ्यावरील मालकी हक्काचे रकान्यात वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेवून इतर सर्व नावे कमी करण्याबाबत आपल्या कार्यालयाकडून शासन निर्णय महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग क्र वक्फ२०१५/प्र क्र /ज–१अ दिनांक १३..४..२०१६... अन्वये वक्फ संस्थेच्या नोंदणीकृत वक्फ मिळकतीवर इतर सर्व नावे कमी करून संस्थेचे नाव लावणेबाबत. देण्यात आलेले आहे

या प्रकरणास पाच वर्षाहून अधिक कालावधी उलटून गेलेला आहे.मात्र अद्यापही त्यावर उपविभागीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नाही.त्यामुळे १५ऑगस्ट २०२३पूर्वी सदरील प्रकरणावर निकाल द्यावा अन्यथा समस्थ मुस्लिम बांधव १५ऑगस्ट पासुन आपल्या कार्यालयासमोर आमरन.. उपोषण करतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे..

या निवेदनावर बसपा चे जिल्हाध्यक्ष आसिफ पठाण . नगरसेवक जावेद शेख .दिलावर बाबूभाई तांबोळी. अमजद युनूस शेख. माजीद सत्तार शेख .नासीर अजिज शेख .हुसेन युसुफ शेख.मोहसीन वजीर मुलांनी. हाजी गुलाब सैय्यद. नाविद शहाबुद्दीन मणियार.शोयाब सादिक शेख.अनिस बनेमिया शेख.. शोयब सलीम सैय्यद .शब्बीर मोहम्मद शेख.नवी अकबर मुलांनी.शाहरुख उस्मान शेख .आदीसह मुस्लिम बांधवांच्या सह्या आहेत.

# कालबध्द वेळापत्रकाव्दारे अनुकंपा भरती प्रक्रिया राबवावी : विभागीय आयुक्त सौरभ राव



पुणे : शासकीय सेवेत कार्यरत असताना निधन झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबावर ओढावणाऱ्या आर्थिक आपत्तीतून बाहेर काढण्यासाठी मदत म्हणून शासकीय कार्यालयातील रिक्त पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येते. अनुकंपा नियुक्तीचे शासनाचे हे प्रयोजन लक्षात घेता अशाप्रकरणी नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी सहानुभूतीपूर्वक दृष्टीकोन ठेवून जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने प्रलंबीत प्रकरणे मार्गी लावावीत. जिल्हा प्रशासनानेसुध्दा कालबध्द वेळापत्रकाद्वारे विभागातील अनुकंपा भरती प्रक्रिया राबवून प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांना त्वरीत नियुक्ती द्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिले.

विभागीय आयुक्तालयातून पुणे विभागातील जिल्हाधिकाऱ्यांशी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधून अनुकंपा भरती प्रक्रियेचा आढावा घेताना ते बोलत होते. पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, उपायुक्त सामान्य प्रशासन वर्षा लड्डा ऊंटवाल, उपायुक्त महसूल रामचंद्र शिंदे व अन्य विभागीय प्रमुख अधिकारी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

पुणे विभागातील अनुकंपा तत्वावरील नियुक्ती प्रकरणे कालबध्द पध्दतीने व जलद गतीने पूर्ण होण्यासाठीचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. अनुकंपा नियुक्तीच्या अनुषंगाने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांशी संपर्क साधून सध्या अस्तित्वात असलेल्या प्रतीक्षा यादीनुसार गट क व ड संवर्गातील रिक्त पदांवर भरती प्रक्रिया तातडीने राबवावी, प्रत्येक वर्षी त्या–त्या संवर्गातील रिक्त पदांपैकी वीस टक्के पदांवर उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती द्यावी, तांत्रिक पदावर नियुक्तीसाठी तांत्रिक अर्हता धारण करणाऱ्या उमेवारांना प्राधान्याने नियुक्ती द्यावी असे निर्देश त्यांनी यावेळी विभागातील जिल्हाधिकाऱ्यांना दिले. शासन स्तरावर जलदगतीने अनुकंपा नियुक्तीसंदर्भात नियमित आढावा घेण्यात येत असल्याने विभागातील प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांना शंभर टक्के नियुक्ती देण्यात यावी अशी सूचना श्री.राव यांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा आढावा


राज्यातील शेतकऱ्यांना कोणत्याही अडचणीशिवाय शेतीसाठी वीज उपलब्ध व्हावी यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. विभागातील या योजनेचा आज विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे आढावा घेतला. यावेळी महावितरणचे विभागातील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

# माहिती कार्यालयात जिल्हा श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष खेलबुडे व राज्य अधिस्वीकृती समितीचे नवनियुक्त सदस्य बोडके यांचा सत्कार

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हा श्रमिक पत्रकार संघाचे नवनियुक्त अध्यक्ष विक्रम खेलबुडे व राज्यस्तरीय अधिस्वीकृती समितीवर शासनाने सदस्य म्हणून नियुक्त केलेले प्रमोद बोडके यांचा सत्कार जिल्हा माहिती कार्यालयात केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रिय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण व जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार उज्वलकुमार माने उपस्थित होते.



# शब्दकोडे क्र ७३



आडवे शब्द १.सुलभ मिळालेले,कष्ट न घेता ३.गुजरातमधील एक प्रसिद्ध शहर ५.गोलमाल चित्रपटाचा नायक ९.किंमत,भाव १०.कारण,निमीत्त १२.सूर्य,दही घुसळण्याचे साधन १३.२६जानेवारी १६.जहाजात वापरण्यात येणारे एक दिशा दाखण्याचे यंत्र १९.धाक,जरब २१.हिसका,दचका २३.रात्री घातलेली पाळत २४.आंब्याचा रस २६.रमरम उलटे करा ३०.इंग्रजीत झाड ३१.क्रौच,एक पक्षी ३३.फणसाची एक जात ३६.पुरे,बेस्टचे एक वाहन ३७.दणकट,राकट ३९.एक मोठा व सुस्त साप ४०.चाट,थाप ४२.ज्याला वारीस नाही असा हिंदीत ४४.पाठवणी,बिदागी ४५.हिंदीत कालचा ४६.अफुचे बी ४८.संत,महंत ४९.मगर ५१.कमीत कमी ५३.एक ताणला जाणारा पदार्थ ५४.काजळ,अंजन हिंदीत ५५.मातीसारखी चव असेलेले ५७.ताजा,तवाना ६०.धारण करणारा ६१.मध ६३.विश्व ६४.संक्रांतीला स्त्रीया हे लुटतात ६५.लहान मुलींचा फ्रॉक ग्रामिण ६७.पावा,बासरी ७०.कढविलेला ऊसाचा रस ७२.मोहन उलटे करा ७३.आरंभ,श्रीगणेशा ७५.हरवणे,गडप ७६.घोडयाला काबुत ठेवण्यासाठी आवश्यक ७७.रानातला मेवा ७८.अजय देवगण,करीश्मा कपुर,जीवन,परेश रावल यांचा एक चित्रपट

उभे शब्द १.सडक,आँखे आदी चित्रपटात खलनायक तथा हास्यकलाकाराचे काम करणारा एक नट २.अमिताभ बच्चन,किमी काटकर यांचा 'जुम्मा चुम्मा'या गीताचा चित्रपट ३.बरकत,भरभराटीचा काळ ४.त्रास,यातना ५.शेवट,अंत ६.मुलगा हिंदीत ७.हात,हस्त ८.आठवडयातील सुटीचा वार १०.शासन,शिक्षा ११.बहुजन समाजवादी पार्टीचे संक्षिप्त रूप १३.धडा,पाठ,मामला १४.कारल्याची चव,कडवट १५.वस्तु,पर्वत १६.संमती कळवणे,मान्य १७.इंग्रजीत तरूणासारखा १८.त्रासलेला २०.स्वयंपाक घरातील एक साधन २२.वीस उभेचे उत्तर २५.पाण्याचा संतत पडणारा बारीक प्रवाह २७.कामदेव,रतीपती २८.एक उंच उडणारा पक्षी ३१.सोन्याची परीक्षा,सत्व ३२.मोठा विळा ३३.चांगला,भला ३४.लोखंड साफ करण्याचे साधन ३५.प्रायव्हेट मराठीत ३६.सुबत्ता,भरभराट ३७.धाण्याचा तुरा ३८.समाप्त हिंदीत ३९.सतत,अखंड ४०.महाभारतातील एक राक्षस ४१.जमीन साफ करण्याचे एक शेतकी साधन ४३.खाली,रिक्त ४७.एक मराठी आडनाव ४८.सोबत रांगेत बसुन जेवणे ५०.मनाची तृप्ती ५१.किडा,कृमी ५२.रोख,पैसे देऊन ५४.मुलगा,धागा ५५.वानर,कपी ५६.इंदिराजींच्या आईचे नाव ५८.वाळुच्या रेघावरून शकुन पाहण्याची एक क्रिया ५९.गाण्याचा सराव ६२.रंजन करणारे ६३.जामीन घेणे,हमी ६४.गाईचे बाळ ६६.गाजावाजा,बोभाटा ६७.ज्याचे मोल करता येत नाही असे ६८.हिंदीत दास,अमीर खान,राणी मुखर्जी यांचा 'आती क्या खंडाला' गाण्याचा चित्रपट ६९.पडणे,ऱ्हास ७०.चिंता,फिकीर ७१.इंग्रजीत विजेता ७३.मुलाची बायको ७४.पवन,वात

# सरकारच्या विरोधात तहसीलसमोर सहकुटुंब चुल पेटविले..

## शेतकऱ्यांची चिमणी पाडली,आता आमची शेती लुबाडणार का..?

### ग्रीनफिल्ड हायवेच्या बाधित शेतकऱ्यांचा सवाल





अक्कलकोट/प्रतिनिधी: सिध्देश्वरांच्या नावाने चालणाऱ्या कारखान्याची चिमणी पाडली.हजारो कुटुंबाच्या रोजंदारीवर गदा आणला.आता आमच्या बाधित शेतीला कवडीमोल दर देऊन रस्त्यावर आणणाऱ्या शासनाला धडा शिकवला जाईल अशी भावना व्यक्त करत अक्कलकोटच्या बाधित शेतकऱ्यांनी तहसीलदार कार्यालयासमोर सहकुटुंब उपस्थित राहुन एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले.घरातील चिमुकल्यांनी आंदोलनस्थळी भाषणे केली. उपोषणस्थळी चुल पेटवुन महिलांनी भाकरी बडवल्या व लक्ष वेधले.

सोलापूर जिल्ह्यातील चार तालुक्यामधून ग्रीनफिल्ड हायवेचा प्रकल्प होणार आहे.मात्र चार लाख प्रतिएकर दर दिल्याने गेल्या सहा महिन्यांपासून शासनदरबारी संघर्ष समितीचे प्रयत्न सुरू आहेत.मात्र लोकप्रतिनिधी आवश्यक सहकार्य न दिल्याने बाधितांनी सहकुटुंब अक्कलकोट तहसीलदार कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले.यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे,

**पालकमंत्र्यांच्या शब्दाला किंमत नाही**
सिध्दाराम म्हेत्रे(माजी ग्रामविकास राज्यमंत्री)
राज्य व केंद्र सरकारने शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे.केंद्राने नाही तर राज्य सरकारने बाधितांना न्याय मिळावा यासाठी पावले उचलावीत.पालकमंत्री विखे पाटील यांनी बैठकीविषयी बाधितांना आश्वासन दिले.परंतु पालकमंत्र्यांच्या शब्दाला जर हायकमांड किंमत देत नसेल तर लोकशाहीला काय अर्थ राहणार आहे.

**आता कुणाचेही ऐकणार नाही : बाळासाहेब मोरे(अध्यक्ष, संघर्ष समिती)**
गेल्या सहा महिन्यांपासून आम्ही जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, पालकमंत्री,उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची समक्ष भेट घेऊन बाधितांच्या भावना पोहचविल्या आहेत.परंतु काहीच उपयोग झाला नाही.आता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन् नंतर मुंबईत सरकारच्या विरोधात सहकुटुंब आंदोलन करणारच.याबाबत कुणाचेही ऐकणार नाही.

**आता लोकप्रतिनिधींच्या घरासमोर चुल पेटवुत : मल्लिकार्जुन पाटील(माजी सभापती)**
नुकसान झालेल्या बाधित कुटुंबानी आज तहसील कार्यालयासमोर चुल पेटविली.याचे भान आमदारांनी ठेवले पाहिजे.पुढचे आंदोलन आमदारांच्या घरासमोर चुल पेटवुत.आम्ही बाधितांसोबत वाढीव मोबदला मिळेपर्यंत राहणार.

संघर्ष समितीचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे,स्वामीनाथ हरवाळकर,रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल वेदपाठक,माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे,प्रियंका दोड्याळे,नागेश नायकोडी,आनंद बुक्कानुवरे, मल्लिकार्जुन पाटील,अशपाक बळोरगी,अॅड बसवराज होळीकट्टी,परमेश्वर गाडवे, शिवु स्वामी,डॉ.विपुल शहा, मुबारक कोरबु, बसवराज अल्लोळी, विकी गाडवे,कालिदास वळसंगे,शाकीर पटेल यांच्यासह बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तहसीलदार बाळासाहेब शिरसाट यांना संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने मागणीचे निवेदन दिले.

# जिल्ह्यात १ ऑगस्टपासून महसूल सप्ताह साजरा होणार

## १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधी: महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा तसेच राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत व्हावा, यासाठी ०१ ऑगस्ट (महसूल दिन) ते ०७ ऑगष्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार असून, या कालावधीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखली जिल्ह्यात महसूल प्रशासनाकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

महसूल सप्ताह निमित्त दिनांक १ ऑगस्ट २०२३ रोजी महसूल दिन साजरा करण्यात येणार असून, महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. तसेच महाराजस्व अभियानातंर्गत केलेल्या कामाची दखल घेऊन महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव सन्मान करण्यात येणार आहे. जमीन महसूल अधिनियम कलम १५५ खालील ई- हक्क पोर्टलवरील प्रलंबित प्रकरणे तलाठयामार्फत निकाली काढणेची कार्यवाही करण्यात येणार आहे. महाराजस्व अभियानातील गाव तिथे स्मशानभूमी, दफनभूमी सुविधा उपलब्ध करण्याबाबत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. दि. २ ऑगस्ट २०२३ रोजी युवा संवाद अतर्गंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कारणासाठी आवश्यक दाखले व प्रमाणपत्रांचे तत्काळ वितरण महाविद्यालय स्तरावर केले जाणार आहेत. विविध घटकांतील लाभार्थी विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व कार्यक्रमाबाबत माहितीपत्रके शाळा, महाविद्यालयांमध्ये वितरीत करुन अंमलबजावणी करण्यात येणार आहे.शालेय विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढणे अद्ययावत करणे यासाठी विशेष मोहिमेर्तंगत शाळेच्या ठिकाणी, स्वस्त धान्य दुकान, बँक, पोष्ट कार्यालय येथे आधार मशीन्स उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. जिल्हयातील शैक्षणिक संस्था तसेच मंडल स्तरावर व तालूका स्तरावर दाखले वाटपासाठी शिबीरे आयोजित करण्यात येणार आहेत.

तसेच दिनांक ०३ ऑगस्ट २०२३ रोजी एक हात मदतीचा या अतर्गंत मान्सुन पुर्व व मान्सुन कालावधीत अवकाळी पाऊस,अतिवृष्टी, पूर यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना देय असलेल्या सोई सुविधा, नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पिक विम्यासाठी विविध दाखले तत्काळ तलाठीस्तरावर प्रदान करण्यात येणार आहेत. प्रत्येक मंडळ मुख्यालयामध्ये महसूल अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. दि.०४ ऑगस्ट रोजी जनसंवाद कार्यक्रमार्तंगत महसूल अदालतींचे आयोजन करुन सर्व स्तरावरील अपिले निकाली काढण्यात येणार आहेत. सलोखा योजनेंतर्गत गावा-गावांतील व शेतातील रस्त्यांबाबत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी शिबिरे आयोजन करण्यात येणार आहेत. आपले सरकार या पोर्टलवर तक्रारी निकाली काढणेबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे. दि. ०५ ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी या कार्यक्रमार्तंगत सैनिकांच्या विविध अडीअडचणींबाबत आढावा घेऊन तातडीने निराकरण येईल तसेच जमिनीचे तंटे, प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

तसेच ०६ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील महसूल संवर्गातील अधिकारी, कर्मचारी यांची प्रलंबित सेवाविषयक बाबी निकाली काढणेत येतील. दिनांक ०७ ऑगस्ट रोजी महसूल विभागामार्फत महसूल सप्ताह निमित्त घेतलेल्या विविध उपक्रमांबाबतची फलनिष्पत्ती व विशेष उल्लेखनीय कामकाजाची दखल घेण्यासाठी महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ आयोजित करण्यात येणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी सांगितले.

# नीरा उजवा कालव्यातील पाणी सोडण्यास आ.आवताडे यांच्या मागणीला यश



पंढरपूर/प्रतिनिधी: यावर्षी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ पुरेसा पाऊस न झाल्याने शेतीसाठी व जनावरांसाठी राहणाऱ्या पाण्याची खूप मोठे संकट शेतकऱ्यासमोर उभे राहिले आहे खरीप हंगामातील पेरणी केलेल्या पिकांना पाण्याने ओढ दिल्याने सध्या या मतदारसंघांमध्ये निर्माण झाले आहे या सर्व परिस्थितीवर पार्श्वभूमीवर आमदार समाधान आवताडे यांनी उभ्या पिकासाठी व जनावरांना पिण्याचे पाण्यासाठी उपलब्ध होण्यासाठी नेहा उजवा कालव्यातून पाणी सोडण्यासाठी मागणी महाराष्ट्र राज्य कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे अंतर्गत कार्यकारी अधिकारी संचालक यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. त्यामध्ये आमदार समाधान आवताडे यांनी पाण्याअभावी खरीप हंगामातील शेतकऱ्यांची पेरणी झालेली पिके अक्षरशा होरपळून चाललेली आहेत त्याचबरोबर जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी पशुपालन धंदा सोडून सगळीकडे भटकंती करावी लागत आहे पाण्याच्या या संकटामुळे शेतकरी व पशु पालक यांची दैनंदिन जीवन योजनेमध्ये हे सहन होत आहे या बाबी बाबीचा विचार करून समाधान आवताडे यांनी नीरा उजवा पाणी सोडण्याची मागणी केली.

आ. अवताडे यांनी चार ते पाच दिवसांपूर्वी पाणी सोडण्याच्या या संवेदनशील मागणीला संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घेऊन नीरा उजवा कालव्यातून पाणी मतदारसंघाच्या दिशेने सोडण्यात आली आहे सदर पाण्याचा प्रवाह माळशिरस पर्यंत आत्ता आला असून लवकर हे पाणी पंढरपूर तालुक्यातील गादेगाव कोर्टी उंबरगाव भवाळी खर्डी कासेगाव तनाळी तपकिरी शेटफळ तावशी एकलासपूर आणि शिरगाव या गावातील शेतकऱ्यांना नीरा उजवा कालव्यातील पाणी सोडण्यासाठी या बहातील जनतेच्या मागणीची पूर्तता आमदार समाधान आवताडे यांच्या पुढाकाराने अखेर प्रत्यक्षात उतरले असल्याची भावना शेतकऱ्याकडून व्यक्त होत आहे



# स्कूल बस नियमावली २०११ चे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे

## पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधी: जिल्हयातील सर्व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक तसेच स्कूलबस चे मालक व चालक यांनी स्कूलबस नियमावली २०११ च्या तरतुदीचे पालन काटेकोरपणे करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी केले. जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची बैठक पोलीस आयुक्त सोलापूर शहर येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी अध्यक्ष स्थानावरून श्री. माने मार्गदर्शन करत होते. या बैठकीस पोलीस उपायुक्त अजित बोराडे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक सायकर तसेच जिल्ह्यातील १८७ शाळाचे मुख्याध्यापक व शाळा प्रतिनिधी उपस्थित होते.

सोलापूर शहर पोलीस आयुक्त श्रीमाने पुढे म्हणाले की जिल्ह्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी तसेच स्कूल बस मालक व चालक यांनी राज्य शासनाने स्कूल बस नियमावली २०११ नुसार शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्या नियमावलीतील तरतुदीप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करावी. या नियमावलीचे पालन न करणाऱ्या सर्व संबंधितावर पोलीस विभागाकडून कारवाई करण्यात येईल असे, त्यांनी निर्देशित केले.शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत सर्व शाळांनी योग्य ती काळजी घ्यावी. तसेच सर्व शाळेच्या प्रमुखांना शाळेच्या आवारात हेल्मेट सक्ती करण्याबाबत श्री. माने यांनी सुचित केले.

सोलापूर शहरातील ऑटो रिक्षा मधून क्षमतेपेक्षा जास्त संख्येने होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाहतुकीवर सोलापूर शहर

### क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या ऑटो रिक्षा चालकावर वाहतूक शाखेकडून कारवाई केली जाणार

वाहतूक शाखेतर्फे आता कारवाई करण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेने स्कूल बसची पार्किंग व्यवस्था सुनियोजित ठेवण्यास ठेवावी. तसेच स्कूलबस पार्किंगमुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा होणार नाही याबाबत काळजी घेण्याचे निर्देश पोलीस उपायुक्त श्री. बोराडे यांनी दिले.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने शालेय विद्यार्थ्यांकरिता सुरू करण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा कवच कक्षाची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती गायकवाड यांनी दिली. तसेच शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम समजावेत याकरिता प्रत्येक शाळेने रस्ता सुरक्षा कक्षाला भेट द्यावी असे आवाहनही त्यांनी केले. या कक्षाला जिल्ह्यातील साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी भेट देऊन वाहतूक नियमावली ची माहिती घेतल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

या बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व शाळेच्या प्रतिनिधींना www.schoolbussafetysolapur.org व www.schoolsafetyakluj.org या दोन संकेतस्थळाबद्दल श्रीमती गायकवाड यांनी माहिती देऊन सर्वांनी वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन केल्यास विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षितपणे होण्यास मदत मिळेल. तसेच या संकेतस्थळांच्या माध्यमातून शाळांनी शालेय परिवहन समिती बाबतची माहिती तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सर्व आवश्यक माहिती भरावी, असे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते विविध शाळांच्या प्रमुखांना रस्ता सुरक्षा कीट चे वाटप करण्यात आले.

## डोळे आलेल्या व्यक्तीने जनसंपर्क टाळावा

# डोळे येण्याच्या प्रमाणात वाढ नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन



**या संसर्गाचे लक्षणे डोळे लाल होणे, वारंवार डोळ्यातून पाणी येणे' तसेच डोळ्यात सूज येणे अश्या प्रकारचे लक्षणे आढळल्यास त्या व्यक्तीने सर्वांचा जनसंपर्क कमी करावा. कारण की,अश्या रुग्णा कडून संसर्ग दुसऱ्या व्यक्तीस होण्याचे प्रमाण अधिक आहे.**

निफाड/प्रतिनिधी: सध्या राज्यात ग्रामीण व शहरी भागात नागरिकांचे डोळे येण्याचे प्रमाण अधिक वाढलेले दिसून येत असुन. त्यानुषंगाने नाशिक जिल्हातील शल्यचिकित्सक डॉ अशोक थोरात, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ संदीप सूर्यवंशी तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ सुधाकर मोरे यांनी सर्व तालुक्यातील जनतेस डोळ्याच्या विषाणूजन्य संसर्ग आजाराबाबत जनजागृती करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. याबाबत पत्रकारांना अधिक माहिती देताना उपजिल्हा रुग्णालयाचे निफाड येथील कार्यरत डॉ राजीव तांभाळे यांनी सांगितले की, ज्या भागात डोळे येण्याची साथ सुरु आहे किंवा रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत

त्या भागात घरोघरी आरोग्य सेवक, सेविका, आशा वर्कर यांच्या मदतीने सर्वेक्षण करण्याबाबत सांगण्यात आले.असुन तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुजित कोशिरे यांनी सर्वांना सुचना केल्या आहेत.ालुक्यातील सर्व जनतेस अहवान करण्यात येते की, सध्या राज्यात अनेक ठिकाणी अजून ही उन्हाळा पावसाळा दिसून येत आहे.सर्वांनी आपले परिसर स्वच्छता ठेवा तसेच वरिल लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. डोळ्याचे विषाणू जन्य संसर्ग आजाराबाबत लागणारे सर्व औषधे लवकरात लवकर सर्व सरकारी रुग्णालयात उपब्धत करण्यात येणार आहे.

# बँकींगसह विविध क्षेत्रामध्ये लोकमान्यने मोठे काम उभारले : मा.आ.प्रशांत परिचारक

पंढरपूर/प्रतिनिधी: पंढरपूर मल्टीपर्जज सोसायटीच्या माध्यमातून बँकींग क्षेत्रामध्ये काम करत असतानाच इतर विविध क्षेत्रामध्येही लोकमान्यने मोठे काम उभारले असून हे काम सहकारी क्षेत्रासाठी उल्लेखनीयच आहे असे प्रितपादन माजी आमदार व कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक यांनी केले आहे. यावेळी व्यासपीठावर दामाजी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, लोकमान्यचे संचालक पंढरी परब, गजानन धामणेकर, विठ्ठल प्रभू, चिफ को कॉर्डीनेटर विनायक जाधव, तरुण भारत संवाद,सोलापूरचे आवृत्ती प्रमुख विजय देशपांडे, उपसंपादक श्रीशैल भद्रशेट्टी, सांगली शाखेचे विभागीय अधिकारी सुदत्त पाठक, सहाय्यक विभागीय व्यवस्थाक प्रदिप पाटील, व्यवस्थापक सुभाष मोरे, सोलापूर शाखा व्यवस्थापक सुभाष भडगावकर, आदी मान्यवर उपस्थित होते. माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते फित कापून स्थलांतरित शाखेचे उद्धाटन,स्टेशन रोड येथील राजलक्ष्मी मार्केटमध्ये शुक्रवार दी.२८ जुलै रोजी सकाळी अकरा वा. करण्यात आले. कार्यक्रमास विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी भेट दिली. यानंतर मंगळवेढा येथील श्री दामाजी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील व अमोल रणदिवे यांनी मनोगत व्यक्त करून बँकेच्या या प्रगतीचे कौतुक केले.यावेळी सांगली, सोलापूर येथील अधिकारी ,कर्मचारी यांच्यासह पंढरपूर शाखेचे व्यवस्थापक सागर राहिरकर, श्रीपाद पोतदार, आकाश वाडेकर, अनंता देवकर व तरुण भारत संवादचे संतोष रणदिवे, दादासाहेब कदम, अतुल फराटे, चैतन्य उत्पात, विनोद पोतदार आदी उपस्थित होते. लोकमान्य मल्टिपर्पज बँकेचे कॉर्डीनेटर विनायक जाधव व डीएमआर फाऊंडेशन महाराष्ट्रचे अमोल रणदिवे यांनी सूत्र संचलन केले.विभागीय व्यवस्थापक सुदत्त पाठक यांनी आभार मानले.



**लोकमान्यचा महाराष्ट्रभर पसार**
लोकमान्य मल्टीस्टेटची शाखा स्थलांतरित होऊन दर्शनीय भागामध्ये स्थलांतरित झाल्याने याचा मोठा फायदा होणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या कानाकोप-यातून आलेले भाविक याच मार्गावरून दर्शनासाठी विठ्ठल मंदिराकडे जातात. यावेळी या भाविकांशी या सोसायटीच्याबाबत माहिती मिळणार आहे. त्यामुळे भविष्यात या सोसायटीची माहिती भाविकांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर पसरणार आहे. **– गजानन धामणेकर, संचालक लोकमान्य मल्टीपर्पज सोसायटी**

**लोकमान्यची ग्राहकांच्या घरापर्यंत सेवा.**
सीमाभागातील युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी, उद्योग व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य मिळावे या हेतूने लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटी सुरू करण्यात आली. गेल्या २७ वर्षात आंतरराज्य दर्जा मिळविला.दैनिक तरुण भारतचे संस्थापक स्व.बाबुराव ठाकूर हे महात्मा गांधीचे अनुयायी होते.त्यांनी दुर्गम भागात शाखा सुरू केल्या. स्व. बाबुराव ठाकूर यांच्या शिकवण लोकमान्य मल्टीपर्पजचे संस्थापक अध्यक्ष किरण ठाकूर यांनी पुढे नेली. चंदगड सारख्या तालुक्यात १८० शाखा बेळगाव येथे सायन्स अँड आर्टस कॉलेज सुरू केले. युवा उद्योजक प्रसाद ठाकूर विविध उद्योग क्षेत्रात भरारी घेत आहेत. बँकेच्या २१३ शाखा ग्राहकांना घरापर्यंत सेवा देत आहेत.
**– पंढरी परब, संचालक, लोकमान्य मल्टीपर्पज सोसायटी**